॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने विश्वलेवा गणबोली दिनानिमित्त उद्या शुक्रवार दि. १ डिसेंबर रोजी व्याख्यान आणि लेवा गणबोली कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

दि. ३ डिसेंबर हा कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा स्मृतीदिन आहे. हा स्मृतीदिन विश्वलेवा गणबोली दिन म्हणून साजरा केला जातो. त्या पार्श्वभूमीवर शुक्रवार दि. १ डिसेंबर रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दुपारी २:३० वाजता सावदा येथील प्रा. व. पु. होले यांचे “लेवा गणबोलीचे माधुर्य” या विषयावर व्याख्यान होणार आहे. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांची देखील उपस्थिती असणार आहे. व्याख्यानानंतर लेवा गणबोली कवी संमेलन होणार असून यामध्ये डॉ. अतुल सरोदे, संध्याताई भोळे, संध्याताई महाजन, शितलताई पाटील, अरविंद नारखेडे हे कवी/कवयित्री सहभागी होणार आहेत.

## बातमी क्र. २

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने उद्या शुक्रवार दि. १ डिसेंबर रोजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४ पासून पदवीस्तरावर महाविद्यालयांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होणार आहे. चार वर्षीय अभ्यासक्रमाची माहिती सर्व घटकांना व्हावी यासाठी शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता अधिसभा सभागृहात होणाऱ्या कार्यशाळेत अधिसभा सदस्य, प्राचार्य/संचालक, संस्थाचालक यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ३० नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी